**नियमित दिवाणी दावा क्र. ३७२/२०२१**

**निशाणी क्र.५ खालील आदेश**

१. वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश ३९ नियम १ व २ अन्वये प्रतिवादी यांचे विरोधात दावा मिळकतीच्या शांततामय कब्जे वहिवाटीस स्वतः अगर इतरामार्फत हरकत अडथळा करू नये असा तात्पुरता मनाई हुकूम मिळणेकामी दाखल केला आहे.

२. प्रस्तुतचा अर्ज मौजे कुगाव, ता.करमाळा, जिल्हा सोलापूर यांचे हद्दीतील गट क्रमांक १३ क्षेत्र ०हे.९२आर पोटखराबा ०हे.७आर या कामी दाखल केले आहे.

३. वादी यांच्या अर्जाचे थोडक्यात कथन की,

दावा मिळकत वादी यांनी दिनांक ३०.०७.२०२० रोजी राजश्री लपाटे, वैभव लपाटे, ओंकार लपाटे यांचेकडून नोंदणीकृत दस्ताने खरेदी केली. तेव्हापासून दावा मिळकत वादी यांच्या कब्जे वहिवाटीत आहे. सदर मिळकतीच्या पूर्वश्रमीच्या मालकांनी दावा मिळकतीचा ताबा वादी यांना दिनांक ३०.०७.२०२० रोजी दिला. त्यानंतर वादी यांनी पाण्याची व्यवस्था केली, ऊसाचे पीक लावले व जोपासले व पीक परिपक्व झाले. दावा मिळकतीत प्रतिवादी अथवा इतर कोणाचाही हितसबंध नाही. प्रतिवादींना वादीने दावा मिळकत खरेदी केल्याचे रूचले नाही. त्यामुळे वादी व पूर्वश्रमीच्या मालकांविरूध्द महसूल दप्तरी खोटे अर्ज दिले. प्रतिवादी नोव्हेंबर २०२१ मध्ये वादींना ऊसाचे पीक तोडण्यास प्रतिबंध केला. पोलीसांकडून वादीवर दबाव आणून ऊसाचे पिक तोडून

नेण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे वादी यांनी मनाई हुकुमाची मागणी केली.

४. प्रतिवादी यांनी निशाणी क्र.२४ अन्वये त्यांचे म्हणणे दाखल केले व वादी यांची संपूर्ण कथने नाकारली. त्यांनी नमूद केले की, वादी व प्रतिवादी क्र.१ व २ व इतर लोकांच्या रे.मु.नं.२८२/२०२० दाखल असून वादी प्रतिवादी क्र.१४ आहे व त्यांनी दाव्यात त्यांचे म्हणणे दाखल केले नाही व वादी प्रतिवादीचे गट क्र.१५ मधील ऊसाचे पिकास हरकत अडथळा करीत आहे असे नमूद केले. गट क्र.१३ मधील (दावा मिळकत) पडीक आहे. ऊसाचे पीक आहे असे भासवून न्यायालयाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करीत आहे. वादी यांच्या गट क्र.१३ मध्ये ऊसाचे पिक नसल्यामुळे तोडून नेण्याचा प्रश्न उद्भवत नाही. प्रस्तुत दाव्यातील व रे.मु.नं.२८२/२०२० मधील वाद मिळकत एकच असल्याकारणाने वादीचे दाव्यास रेस जुडीकेटाची बाधा येते.

५. गट क्र.१३, १४, १५ पूर्वी गणेश लपाटे यांच्या मालकीचे होते. त्यांनी त्यांची मुले श्रीराम, लक्ष्मण, रमाकांत यांचेमध्ये वाटप करून दिले. गट क्र.१३, १४, १५ चे ७/१२ पत्रकी नाव लावणेसंदर्भात उपविभागीय अधिकारी, माढा, विभाग कुर्डुवाडी येथे आरटीस अपील ११/२०२० प्रलंबित आहे. प्रतिवादी यांनी दिनांक १२.०६.२०१९ च्या दैनिक पुण्यनगरीमध्ये त्यांचे हितसंबंध गुंतले असल्यामुळे त्यांचे परस्पर कोणी हस्तांतरणाचा व्यवहार करू नये अशी नोटीस दिली होती. वादींना या नोटीसीची माहिती होती व प्रतिवादीला त्रास देण्याच्या उद्देशाने गट क्र.१३ खरेदी केले. वादींचा मोठा जमाव आहे. प्रतिवादीने सदरचे क्षेत्र सोडून दयावे म्हणून दबाव आणत

आहे. आरटीएस अपील क्र.५७/२०२०, १००/२०२१, १०१/२०२१, १०२/२०२१, १०३/२०२१ गट क्र.१३, १४, १५ करीता प्रलंबित आहेत. वादी याने निवडणूक आयोगाला खोटे शपथपत्र दाखल केले. वादी व त्यांचा भाऊ यांचेविरूध्द विविध फौजदारी प्रकरणे प्रलंबित आहेत. प्रतिवादी क्र.३ यांनी दिनांक ०३.०४.२०२१ रोजी वादीच्याविरूध्द अदखलपात्र गुन्हा नोंदविला आहे. त्यामुळे त्यांनी मनाई हुकुमाचा अर्ज नामंजूर करण्याची मागणी केली.

६. दोन्ही सन्माननीय विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. पटलावरील कागदपत्राचे अवलोकन केले व खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित झाले. सदर मुद्दयाचे निष्कर्ष त्याचे कारणमींमासेसह खालीलप्रमाणे नमूद केले.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | वादी यांना प्रथमदर्शनी प्रकरण आहे ही बाब ते सिध्द करतात काय? | होय |
| २ | दाव्याचा समतोल वादी यांच्या बाजूने आहे काय? | होय |
| ३ | अपरिमित नुकसान वादी यांच्या बाजूने आहे काय ? | होय |
| ४ | आदेश? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## <u>कारणमींमासा</u>

**<u>मुद्दा क्र.१ ते ३ करीता–</u>**

७. वादी व प्रतिवादी यांचे विधिज्ञांनी युक्तीवादाद्वारे आपआपल्या कथनांचे समर्थन केले व परस्परविरोधी कथने युक्तीवादाच्या आधारे खोडण्याचा प्रयत्न केला.

८.  वादी यांच्या विधिज्ञांनी मूळ पुरूष गणेश लपाटे यांनी त्यांची मुले श्रीराम, लक्ष्मण, रमाकांत यांच्यात वाटणी करून दिली. दावा मिळकत रमाकांत यांच्या वाटणीस आली. रमाकांत यांच्या वाटणीस आलेल्या मिळकतीपैकी काही क्षेत्र १९७५–७६ मध्ये गट क्र.१३ (सव्र्हे क्र.४/३) मधील २हे.०आर व पोट खराबा ०हे.१५आर मिळकत उजनी जलाशयासाठी संपादित केली. त्यानंतर पुन्हा सव्र्हे ४/३ पैकी ३हे.१४आर क्षेत्र संपादित केले. एकूण ५हे.१४आर व पोटखराबा ०हे.१५आर (एकूण ५हे.२९आर) क्षेत्र संपादित होणे गरजेचे असताना एकूण ५हे.८६आर संपादन झाले असे दर्शविले त्यामुळे रमाकांत यांच्या नांवे ५७ आर क्षेत्र कमी दर्शविले होते. त्यामुळे रमाकांत यांनी उता–यावर जमीन महसूल अधिनियम कलम १५५ अन्वये दुरूस्ती करीता अर्ज दिला. सदर अर्जावर सुनावणी होऊन रमाकांत यांचे नांवे गट क्र.१३ मध्ये ०हे.९२आर व पोटखराबा ०हे.७आर सरकार जमा क्षेत्र ५हे.०आर पोटखराबा ०हे.२९आर ची दुरूस्ती करण्याचे आदेश दिले. त्याच दरम्यान सदर अधिका–यांच्या निदर्शनास आले की, गट क्र.१५ मधील संपूर्ण समक्षेत्र संपादित झालेले असून त्यांचे उता–यावर ४हे.१६आर अशी नोंद दिसत असल्याचे त्यांनी अभिप्राय नोंदविला व सदरची चूक ही हस्तलिखित चूक असल्याचे गृहित धरून गट क्र.१५ चे उता–यावर संपूर्ण क्षेत्र ०६हे.०३आर व पोट खराबा २७आर सरकार जमा असल्याचे दुरूस्ती करण्याचे आदेश दिले. त्या अनुषंगाने रमाकांत यांच्या गट क्र.१३ च्या ७/१२ उता–यावर सदरची नोंद दर्शविण्यात आली. त्यानंतर रमाकांत यांच्या मृत्यनंतर त्यांच्या वारसांनी दावा मिळकत वादी यांना नोंदणीकृत दस्तान्वये खरेदी दिली.

९. वादी यांच्या दावा मिळकतीत ऊसाच्या पिकाची तोडणी करणे अत्यावश्यक असताना प्रतिवादी ऊस तोडणीस हरकत अडथळा करीत आहेत. त्यामुळे त्यांनी मनाई हुकुमाची मागणी केली. प्रतिवादी यांच्या सन्माननीय विधिज्ञांनी रे.मु.नं.२८२/२०२० प्रस्तुत वादींविरूध्द प्रलंबित आहे. महसूल अधिकारी यांच्याकडे विविध प्रकरणे प्रलंबित आहेत. रमाकांत यांचा मृत्यु १८.११.२०१९ रोजी झाला. तहसिलदार यांनी सदर अर्जात वारस प्रकरणात समाविष्ट न करता बेकायदेशीर प्रोसीडींग चालवून निर्णय दिला. सदरचा अर्ज गट क्र.१३ मधील दुरूस्ती मागितली असताना संपूर्ण गट क्र.१५ सरकार जमा करण्याचा कोणतेही कारण नव्हते, गट क्र.१५ च्या धारकांना नोटीस दिली नाही. रमाकांत यांच्या हयातीत गट क्र.१५ मधील नांवे कमी करून गट क्र.१३ मध्ये नाव लावण्याचे ठरले होते व दरम्यान रमाकांत यांचा मृत्य झाला. गट क्र. १५ च्या धारकांना भूसंपादनाच्या नुकसानभरपाईची रक्कम मिळाली नाही. गट क्र.१३ वडिलोपार्जित आहे. दिनांक १२.०६.२०१९ रोजी वर्तमानपत्रात नोटीस प्रसिध्द केली होती. गट क्र. १३ पडीक आहे अशा परिस्थीतीत खोटया माहितीच्या आधारे वादी यांनी प्रस्तुतचा दावा दाखल केला व त्यांनी प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्याची मागणी केली.

१०. दोन्ही बाजूनी आपआपल्या कथनाच्या पुष्ठयर्थ वादी यांनी गट क्र.१३ चा ७/१२ उतारा, फेरफार नोंद क्र.१५१०, दिनांक ३०.०७.२०२० रोजीचे खरेदीखत, तहसिलदार करमाळा यांचे दिनांक १६.०३.२०२० रोजीचे आदेशाची प्रत दाखल केली. प्रतिवादी यांनी त्यांच्या कथनाच्या पुष्ठयर्थ रमाकांत लपाटे यांनी दिनांक ०९.०५.२०१९ रोजी दाखल केलेला अर्ज, सदर प्रकरणाची नोटीस, निकालाची समज, जिल्हाधिकारी

यांचेकडे दिलेला दिनांक ०५.०६.२०२० रोजीचा अर्ज, फेरफार नोंद क्र.५०४ रद्द होणेबाबतचा अर्ज, गट क्र.१३ व १५ चे छायाचित्र दाखल केले.

११. प्रस्तुतचा दाव्याचे स्वरूप पाहता दावा निरंतर मनाई हुकुमासाठी दाखल केला आहे. वादी यांना रमाकांत यांच्या वारसाकडून नोंदणीकृत खरेदीद्वारे हक्क प्राप्त झाल्याचे दिसून येते. सदरची नोंदणीकृत खरेदी ही एकूण गट क्र.१३ च्या ०हे.९२आर व पोटखराबा ०हे.०७आर या करीता झाल्याचे दिसून येते. गट क्र.१३ मध्ये भूसंपादनानंतर उर्वरीत असलेले क्षेत्राबाबत रमाकांत यांनी दिलेल्या अर्जावर तहसिलदार करमाळा यांचा दिनांक १६.०३.२०२० रोजीचा आदेशाद्वारे ७/१२ पत्रकी चुकीने दर्शविलेले क्षेत्र दुरूस्त करण्याचे आदेश दिले. १९७६ साली गट क्र.१३ (मूळ सव्हे क्र.४/३) मधून २हे.०आर व पोटखराबा ०हे.१५आर भूसंपादित केले. त्यानंतर पुन्हा गट क्र.१३ (मूळ सव्हे क्र.४/३) मधून ३हे.१४आर व पोटखराबा ०हे.०आर भूसंपादित केले त्यामुळे गट क्र.१३ (मूळ सव्हे क्र.४/३) मधून एकूण ५हे.१४आर व पोटखराबा ०हे.१५आर असे एकूण ५ हे.२९आर भूसंपादित केलेचे प्रथमदर्शनी दिसून येते. त्यामुळे रमाकांत यांच्या हक्कात ०हे.९२आर व पोटखराब ०हे.७आर शिल्लक असल्याचे दिसून येते.

१२. रमाकांत यांच्या वारसांनी वादी यांचे लाभात ९२आर क्षेत्राची नोंदणीकृत दस्ताद्वारे गट क्र.१३ मध्ये ९२आर व पोट खराबा ०७आर क्षेत्राची खरेदी केली व दिनांक ३०.०७.२०२० रोजी मिळकतीचा ताबा दिला. रे.मु.नं.२८२/२०२० हा गट क्र.१३ मधील ९२आर व पोटखराबा ७आर याची वाटणी होवून मिळणेकामी दाखल

केला असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. अदयापपावेतो सदर दाव्यात संपूर्ण पक्षकारांवर समन्सची बजावणी झालेली नाही असे दिसून येते. प्रतिवादी यांनी वर्तमानपत्रात खरेदीबाबत नोटीस प्रसिध्द केल्याची दिसून येते. वादी यांनी शपथपत्राआधारे गट क्र.१३ मधील ऊसाचे पीक तोडणीस लायक/योग्य झाल्याचे नमूद केले. प्रतिवादी यांनी गट क्र.१३ मध्ये ऊस नाही याच्या पुष्टीकरीता छायाचित्रे दाखल केली. परंतु सदर छायांचित्रांद्वारे कोणते छायाचित्र कोणत्या गटाचा या निष्कर्षाप्रत या प्राथमिक अवस्थेत भाष्य करता येणार नाही. गट क्र. १३,१४,१५ यांचे वाटप होवून रमाकांत यांच्या हिश्यास गट क्र.१३ प्राप्त झाल्याचे दिसून येते. तहसिलदार यांच्या आदेशानुसार गट क्र.१३ मध्ये दोन वेळा जमीन संपादित होवून उर्वरीत क्षेत्र ०हे.९२ आर व पोटखराबा ०हे.७आर असल्याचे तहसिलदार करमाळा यांच्या आदेशान्वये दिसून येते. सदरचा आदेश वरिष्ठ अधिका–याकडे आव्हानित केल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. त्यामुळे सदरचा आदेश नामंजूर झाला या अनुमानापर्यंत पोहोचत नाही अथवा सदरचा कोणत्या आदेशाने कृती करू नये असा आदेश प्राप्त केल्याचे दिसत नाही. त्यामुळे परंतु निश्चितच वादी यांना नोंदणीकृत खरेदीखताद्वारे दावा मिळकतीचा ताबा दिला असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते.

१३. प्रतिवादी यांनी दाखल केलेले अर्ज प्रलंबित आहेत. प्रतिवादी यांनी दाखल केलेला दावा प्रलंबित आहे. अशा परिस्थीतीत या प्राथमिक अवस्थेत प्रतिवादी वादी यांच्या शेतात ऊस नसल्याचे नाकारतात व गट क्र.१५ मधील ऊस नेण्यास अडथळा आणतात असे नमूद करतात. गट क्र.१५ मधील ऊस नेण्यास वादी यांनी

हरकत अडथळा केल्यास प्रतिवादी यांना कायदेशीर मार्ग उपलब्ध आहेत. तसेच प्रथमदर्शनी ताबा वादी यांचा दिसून येतो. अशा परिस्थितीत कायदेशीर ताबा प्राप्त करणा–या व्यक्तीच्या ताबे वहिवाटीस हरकत अडथळा आणल्यास व त्याची हरकत अडथळयास मनाई हुकूमासाठी दाव्याचा कल, समतोल वादी यांच्या बाजूने असल्याचे दिसून येते. शेतातील ऊस नाशवंत आहे, गट क्र.१३ मधील ऊस वेळेत कारखान्यास न पोहोचल्यास तो वाळून जाऊन वादी यांचे कधीही न भरून येणारे नुकसान होऊ शकते. त्यामुळे मुद्दा क्र.२ व ३ चे उत्तर होकारार्थी नोंदवितो व खालीलप्रमाणे आदेश पारीत करतो.

## **आदेश**

१. वादी यांचा अर्ज मंजूर.

२. प्रतिवादी यांना वादी यांचे कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करू नये असा तात्पुरता मनाई हुकुम देण्यात येतो.

दिनांक–२२.१२.२०२१

(रा.अ.शिवरात्री)
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, करमाळा

**–: <u>प्रमाणपत्र</u> :–**

मी प्रमाणित करतो की, सदर पी.डी.एफ. संचिकेच्या मजकुरातील शब्द न शब्द मुळ न्यायनिर्णय / आदेशाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नांव :– लबडे एन.बी.

न्यायालयाचे नांव :– सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, करमाळा.

पीडीएफ फाईल अपलोड केल्याचा दिनांक :– २३.१२.२०२१.

स्वाक्षरीत/–

लघुलेखक.